# 12 मार्च

## आजचा सुविचार :

“कष्टाविना फळ नाही.”

## आजचे पंचांग :

वार – शनिवार

दिनांक : 12 मार्च 2022

मास - फाल्गुन

नक्षत्र – आर्द्रा

सूर्योदय – सकाळी 6. 43 वाजता

सायंकाळी 6. 42 वाजता

## आजचे दिनविशेष :

सन 1930 साली महात्मा गांधी यांनी दांडी यात्रेला सुरुवात केली होती.

सन 1999 साली सरकारी नोटांवर यापुढे महात्मा गांधी यांचीच प्रतिमा छापण्यात येण्याचा निर्णय सरकारतर्फे घेण्यात आला

सन 1954 साली भारत सरकार मार्फत साहित्य अकादमी पुरस्काराचे उद्घाटन करण्यात आले.

## आजचे इंग्लिश शब्द : ( Parts of body / शरीराचे अवयव ) :

1) Neck – मान 2) Stomach - पोट 3) Knee – गुडघा 4) Elbow : कोपर

## आजची प्रश्नमंजुषा :

1) राष्ट्रीय सण कोणकोणते आहेत?

2) तीन द्रवरूप पदार्थांची नावे सांगा.

3) 5 किलोमीटर म्हणजे किती ग्रॅम?

4) आपल्या राज्यघटनेचे शिल्पकार कोण?

5) सौरमंडळातील सर्वात मोठा ग्रह कोणता?

**बोधकथा :**

## वक्ता आणि श्रोते

एक विद्वान वक्ता एका अतिशय महत्वाच्या विषयावर तळमळीने भाषण देत होता. मात्र श्रोत्यांची चुळबुळ सुरु होती. काहीजण इकडे बघ तर काहीजण रस्त्यावर खेळणा-या लहानमुलांकडे बघत होते. तेव्हा श्रोत्यांचे आपल्या व्याख्यानाकडे अवधान खेचून आणण्यासाठी वक्त्याने एक गोष्ट सांगायला सुरुवात केली.

कथेची सुरुवात होताच जादूची कांडी फिरल्याप्रमाणे सर्व श्रोते अतिशय सावधपणे गोष्ट ऐकू लागले. वक्ता म्हणाला,'एकदा एक देव, एक पाणसर्प आणि एक चिमणी हे तिघे एकत्रितरित्या प्रवासाला निघाले. चालता चालता त्यांना वाटेत एक नदी लागली. चिमणीने उडून पैलतीर गाठला. पाणसर्प पाण्यातून पोहत पोहत पलीकडे पोहोचला."

बस्स इतकेच असे सांगून वक्त्याने आपले अर्धवट राहिलेले भाषण चालू केले. श्रोते आता जोरजोराने ओरडू लागले," अहो वक्ते महाशय, देवाचे पुढे काय झाले, त्याने कशी काय नदी पार केली. त्या तिघांचे पुढे काय झाले."

वक्त्याने शांतपणे उत्तर दिले,"देवच तो; तेव्हा ती नदी पार करून जाण्याचे सामर्थ्य त्याच्याठायी असणे सहाजिकच आहे. तो पाण्यावरूनही चालत गेला असेल किंवा पाण्याला बाजूला सारून जाण्याचीही त्याच्यात होती पण तो अलिकडच्याच तीरावर थांबला."

श्रोत्यांनी मोठ्या उत्कंठेने विचारले की देवाने असे अलिकडेच थांबण्याचे कारण काय. यावर वक्ता म्हणाला," ज्या मूर्खांना महत्वाच्या विषयावरचे असणारे व्याख्यान न आवडता मनोरंजक गोष्टी आवडतात त्या मुर्खांचा विचार करत देव नदीकिनारी बसून आहे. जर तुम्ही या महत्वाच्या विषयाबद्दल माझे विचार ऐकून त्यावर काही उपाय केले व आपल्या राज्याला वाचविले तर देव निश्र्चित पलीकडच्या तीरावर निघून जाईल" वक्त्याचा चतुरपणा कामी आला व श्रोत्यांनी पुढील व्याख्यान शांतपणे ऐकून घेतले.

**तात्पर्य :-** काही वेळेस आपल्या चांगल्या व देशहिताच्या योजना लोकांच्या गळी उतरविण्यासाठी युक्तीप्रयुक्तीचा वापर करावाच लागतो.